नि.दि.दावा क्र. ३८/२०१४

सुनिता वि. तुकाराम +६
निशाणी क्र. ५५ खाली

**प्रतिवादी क्र. १ चा पुढील सरतपास शपथेवर श्री.एस.बी.देवकते वकील साहेब यांचे मार्फत –**

सदर प्रकरणात मी माझे प्रतिज्ञापत्र दाखल केले असुन ते माझे सांगण्याप्रमाणे तयार करण्यात आले आहे. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

सरतपास पूर्ण.

**प्रतिवादी क्र. १ चा उलटतपास वादी तर्फे श्री. ए.एस.राशिनकर वकील साहेब यांचे मार्फत –**

हे म्हणणे खरे आहे की, जमीन गट क्र. ९२ क्षेत्र ०० हे १२ आर व गट क्र. १२३ क्षेत्र ०२ हे ०० आर या जमीनींचा पूर्वीचा सर्वे क्र. ६०/१ व ६०/२ असे होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर दोन्ही जमीनी या वर्ग १ मधील जमीनी होत्या. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, हाडोळयाच्या ईनामी जमीनी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदर दोन्ही जमीनी दाजी महार ओहाळ हे मयत झाल्यानंतर या दोन्ही मिळकती बाबु दाजी महार (ओहाळ) यांच्या नावे आल्या. दाजी महार माझे आजोबा होते. हे म्हणणे खरे आहे की, बाबु ओहाळ मयत झाल्यानंतर या दोन्ही जमीनी माझे नावे झाल्यात. हे म्हणणे खरे आहे की, सदर दोन्ही जमीनी या मला आजोबा व वडीलांकडुन आल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, जसा दावा जमीनीमध्ये माझा हिस्सा आहे तसा माझे नंतर माझ्या मुलीचा हिस्सा आहे. सुनिता माझी मुलगी आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी अद्यापपर्यंत दावा मिळकत वाटुन दिलेली नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, मी कोणत्याच पोराला वाटुन दिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आजोबा व वडीलानंतर दावा मिळकतींवर कुटुंब कर्ता म्हणुन माझे नाव असुन

त्यामध्ये वादी व इतर सर्वांचे हिस्से आहेत. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, माझ्या बहिणींचे देखील त्यात हिस्से आहेत. मला वंदना, अनिता, सुनिता, सविता, सचिन व अविनाश असे मुले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, केशरबाई माझी पत्नी मयत झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला वादी व प्रतिवादी क्र. ३ ते ७ यांच्या व्यतिरीक्त कायदेशिर वारस नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील वारल्यानंतर माझे बहिण नामे राधाबाई चाबुकस्वार, झींगाबाई माने व नागरबाई पोळ यांची नावे ७/१२ ला लागलेली नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, अद्यापपर्यंत त्यांची नावाने आजतागायत फेरफार आणि महसुलला नोंद लागलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, राधाबाई चाबुकस्वार, झींगाबाई माने व नागरबाई पोळ या माझ्या बहिणी असल्याचे कागदोपत्री मी दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, या तिन्ही बहिणींनी वडील जिवंत असताना व ते मयत झाल्यानंतर माझेवर दावा मिळकतीच्या अनुशंगाने दावा दाखल केला नव्हता.

मी सोमा नरुटे व वसंत ओहाळ यांना जमीन विक्री करताना शासनाची परवानगी घेतली नव्हती. सदर जमीनी मी मालक असल्यामुळे मी विक्री केल्या. हे म्हणणे खरे नाही की, मी जमीनी विक्री केल्याचे वादीला माहिती नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी दावा मिळकती सुनिताने दावा दाखल करण्यापूर्वी विक्री केल्या. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकती या वडीलार्जित असल्यामुळे त्यात वादीचा हिस्सा आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, सर्वांचाच हिस्सा आहे.

हे म्हणणे खरे नाही की, मला राधाबाई चाबुकस्वार, झींगाबाई माने व नागरबाई पोळ या बहिणी नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, वादीला हिस्सा न मिळावा म्हणुन मी दाव्यात सदर दावा मिळकती या शासनाच्या असुन त्या शासना मार्फत आजोंबाना मिळाल्याचे मी खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीला हिस्सा मिळु नये म्हणुन मी बहिणींचे नावे व शासनाची संपादित जमीन असल्याचे असे खोटे नमुद केले आहे.  हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये वादीचा हिस्सा नाही असे खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी कैफियत

दाखल करुन खोटे शपथपत्र दाखल केले व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**प्रतिवादी क्र. ४ व ५ व त्यांच्या विद्वान वकिलांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर करीता उलटतपास काही नाही.**

उलटतपास पूर्ण.

फेर तपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-

( पी.एस.ठाकरे )

दिनांक-०९.०१.२०२४ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, परंडा